N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** शिराळा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0034 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**07/04/2026 03:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिंनाक पासून):** 06/04/2026

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिंनाक पर्यंत):** 06/04/2026

**Time From (वेळेपासून):** 13:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 07/04/2026 **Time (वेळ):** 01:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 07/04/2026 02:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हटेल दौलत, शिराळा ,शिराळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** किशोरकुमार मारुती खाडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 01/06/1970

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | Kodoli,Panhala,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,416114,भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्शन ब्युरो, सांगली,सांगली,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेविका सौ. शितल बाळासाहेब पाटील | | | 1. वाकुडे खुर्द ,शिराळा,शिराळा , सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | लोकसेवक श्री. बाळासाहेब आकाराम पाटील | | | 1. पाटील गल्ली, ,वाकुडे खुर्द,, शिराळा,शिराळा ,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 07.04.2026

मी श्री. किशोरकुमार मारूती खाडे, वय - 35 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9420115193

सरकारतर्फे फिर्यादी होवून देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 05/04/2026 रोजी 16.47 वा चे सुमारास पोलीस उप-अधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास संपर्क करून तक्रारदार श्री. शैलेश वसंतराव पाटील, रा.वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली यांनी फोनव्दारे संपर्क करून त्यांची ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्दे येथील सरपंच सौ.शितल पाटील यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवली असलेचे सांगून त्यांची तक्रार शिराळा येथे येवून घेण्याची विंनती केली असता तक्रारदार यांना आम्ही पथकासह दि. 06.04.2026 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास शिराळा येथे येत असलेचे कळवून संपर्क करीत असल्याचे सुचना दिल्या असल्याचे सांगितले. तसेच इनामदार मॅडम यांनी मला तक्रारदार यांची तक्रार ऐकुन पुढील कारवाई करणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयात पाठवण्याबाबत विंनती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांना संपर्क करून त्यांना दि. 06.04.2026 रोजी सकाळी 09.00 वाजता एसीबी कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.06.04.2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 09.00 वा चे सुमारास एसीबी कार्यालय येथे आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी दोन्ही पंचांना लोकसेविका यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करून लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील, पोकॉ/चंद्रकांत जाधव व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, पिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 09.10 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, आष्टा, इस्लामपूर मार्गे, शिराळा बायपास रोडवरील गोरक्षनाथ मंदीर येथे सुरक्षित ठिकाणी 10.30 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर इनामदार मॅडम यांनी तक्रारदार शैलेश पाटील यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील हे त्यांचेकडील स्कोडा कार क्र.एमएच-03-बीएच-0206 मधून आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करून दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. अजय मरगु सावंत यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. प्रशांत सुदाम आमते यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांनी नवबौध्द घटक वस्ती वाकुर्डे खुर्द येथील विकास योजने अंतर्गत पेव्हींग ब्लॉकचे केले कामाचे ताबा पावती देणेसाठी व मंजुर बिलातील कपाती शासन जमा करणेकरीता ग्रामपंचायत वाकुर्डे येथील सरपंच सौ.शितल बाळासाहेब पाटील यांनी मंजूर बिल रक्कमेच्या 7 टक्के प्रमाणे लाचेची मागणी केली आहे अशा आशयाची हकीकत सांगीतले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे मध्ये "मी पाटील गल्ली वाकुर्डे खुर्द शिराळा येथे माझे कुटुंबासह राहण्यास आहे. आमचे तालुक्यातील श्री श्रीनिवास सदाशिव पाटील रा. तडवळे, ता. शिराळा, जि. सांगली यांना वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती पेोंव्हग ब्लॉक बसविणेचे रक्कम 10,00,000/- रुपयेचे टेंडर मिळाले होते.

ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द, ता. शिराळा यांचेकडील क्र.ग्राप/ वर्कऑर्डर/2024/2025 दि.19.05.2025 टेंडर नं. ब-1/01/25-26 अन्वये काम सुरु करणे बाबत वर्क ऑर्डर दिली होती. त्याप्रमाणे वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती पोंव्हग ब्लॉक बसविणेचे काम सुरु केले होते. श्री श्रीनिवास सदाशिव पाटील रा. तडवळे, ता. शिराळा, जि. सांगली यांनी सदर कामावर देखरेख करणे बाबत सांगीतले होते. त्याप्रमाणे मी सदर काम पाहत होतो. श्री श्रीनिवास पाटील यांनी मला सदर कामाची देखरेख व प्रशासकीय कामकाजासाठी दि.12.03.2026 रोजी 500/- रुपयेच्या स्टॅम्पवर अधिकार पत्र दिले आहे.

दि.18.12.2025 रोजी सदर काम पुर्ण झाले होते. श्री रविंद्र मठकरी विस्तार अधिकारी, पंचायत समिती शिराळा यांनी दि.22.12.2025 रोजी वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती येथे पोंव्हग ब्लॉक बसवलेल्या ठिकाणी भेट देवुन पुर्ण झालेल्या कामाचा तपासणी अहवाल दिला होता.

श्री जाधव, डेप्युटी इंजिनियर, पंचायत समिती शिराळा यांनी कामाचे मोजमाप घेवुन नमुना 58 - सी प्रमाणे 9,90,776/- रुपयांचे बिल तयार करुन मंजुरी करीता जिल्हा परिषद सांगली येथे पाठवले होते. त्याप्रमाणे सदर बिलाचा पहिला हप्ता मंजुर करण्यात आला होता. गट विकास अधिकारी, पंचायत समिती शिराळा यांनी दि. 29.12.2025 रोजी ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द ता. शिराळा, जि. सांगली यांना वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती येथे पोंव्हग ब्लॉक बसवले कामाचा पहिला व दुसरा हप्ता अदाई बाबत पत्र काढले होते. त्यानुसार अंतिम बिल अनुज्ञेय रक्कम 9,90,776/- रक्कमेच्या 60 टक्के पहिला हप्ता रक्कम 6,00,000/- रुपये मंजुर करण्यात आला होता. सदर कामाचे संदर्भातील विमा, उपकर, आयकर, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती मंजुर रक्कमेतुन शासनास जमा होणेसाठी 71435/- रुपये ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी खात्यावर जमा होवुन उर्वरीत रक्कम 528565/- रुपये श्रीनिवास पाटील यांच्या खात्यावर जमा झाले आहेत. परंतु ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांचे ग्रामनिधी खात्यावर जमा झालेले 71435/- रुपये शासन लेखाशिर्षकी खाते जमा केले नसल्यामुळे तसेच सदर पुर्ण झाले कामाची श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द व ग्रामसेवक यांची सही असलेली ताबा पावती दिली नसल्याने मंजुर बिलाचा दुसरा हप्ता मिळण्यास विलंब होत होता.

ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी खात्यावर विमा, उपकर, आयकर, टेंडर प्रमाणे, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती करीता जमा झालेले 71435/- रुपये शासन लेखाशिर्षकी खाते जमा करण्यासाठी व वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती येथे पोंव्हग ब्लॉक बसवले काम ग्रामपंचायतीकडे वर्ग करुन त्याची ताबा पावती देण्यासाठी श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांची भेट घेतली असता सरपंच श्रीमती शितल पाटील सदर कामाचे एकूण मंजुर अनुदान रकमेच्या 7 टक्के रक्कम दिल्यानतरच कपाती शासन जमा करु व ताबा पावती सही करुन देवु असे म्हणुन लाच मागत आहेत.

आज रोजी मी श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांची भेट घेवून ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी खात्यावर विमा, उपकर, आयकर, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती करीता जमा झालेले 71435/- रुपये शासन लेखाशिर्षकी खाते जमा करणे व वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती येथे पोंव्हग ब्लॉक बसवले काम



Scanned with OKEN Scanner

ग्रामपंचायतीकडे वर्ग करून त्याची ताबा पावती देण्याचे कामा संदर्भात चर्चा करणार आहे. त्यावेळी श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द माझ्याकडे मंजुर अनुदार रक्कमेच्या 7 टक्के रक्कमेची लाच मागणी करतील याची मला खात्री आहे. मला श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझेत व श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विंनती." अशी हकीकत तक्रारी अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेविका शितल पाटील यांचेविरुध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही 11.40 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये निवेदनाची फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याची खात्री करून दिली.

त्यानंतर लोकसेविका शितल पाटील यांचा ठावठिकाणा निश्चित करणेसाठी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांचे मोबाईलवरून त्यांना कॉल करून पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर आम्ही दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी त्यांचे मो.क्र. 9561532514 वरून लोकसेविका शितल पाटील यांचे मो.क्र. 9021082319 वर कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारलेनंतर लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.52 वाजता सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांना त्या एक तासाने शिराळा येथे येत असलेचे सांगून आलेनंतर फोन करीत असल्याचे सांगून फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 002 ही सेव्ह असल्याची खात्री करून दिली.
त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेविका शितल पाटील यांचा तक्रारदार शैलेश पाटील यांना कॉल आलेनंतर पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे शिराळा गावामध्ये महत्वाचे काम असल्याचे सांगून सदरचे काम करून तात्काळ येतो असे म्हणून ते 12.20 वा चे सुमारास निघून गेले. आम्ही व सापळा पथक असे गोरक्षनाथ मंदीर शिराळा येथे थांबून राहिलो. त्यानंतर 13.10 वा चे सुमारास तक्रारदार हे आमचे समक्ष हजर झालेत. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर लोकसेविका शितल पाटील 12.56 वाजता व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांचा 01.01 वाजता मिस कॉल येवून गेला असल्याची हकीकत सांगितली.

वर्दी जबाब दि. 07.04.2026

मी श्री. किशोरकुमार मारुती खाडे, वय - 35 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9420115193

सरकारतर्फे फिंयादी होवून देतो फिंयादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 05/04/2026 रोजी 16.47 वा चे सुमारास पोलीस उप-अधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास संपर्क करून तक्रारदार श्री. शैलेश वसंतराव पाटील, रा.वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली यांनी फोनव्दारे संपर्क करून त्यांची ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द येथील सरपंच सौ.शितल पाटील यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवली असलेचे सांगून त्यांची तक्रार शिराळा येथे येवून घेण्याची विंनती केली असता तक्रारदार यांना आम्ही पथकासह दि. 06.04.2026 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास शिराळा येथे येत असलेचे कळवून संपर्क करीत असल्याचे सुचना दिल्या असल्याचे सांगितले. तसेच इनामदार मॅडम यांनी मला तक्रारदार यांची तक्रार ऐकुन पुढील कारवाई करणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी लागलीच मा. उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयात पाठवण्याबाबत विंनती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक



Scanned with OKEN Scanner

प्राप्त करून त्यांना संपर्क करून त्यांना दि. 06.04.2026 रोजी सकाळी 09.00 वाजता एसीबी कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि.06.04.2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच 09.00 वा चे सुमारास एसीबी कार्यालय येथे आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी दोन्ही पंचांना लोकसेविका यांचेविरुध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, श्रीमती यास्मीन इनामदार, पोलीस उप अधीक्षक, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील, पोकॉ/चंद्रकांत जाधव व चालक रजपूत असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, पिं्रटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अं्थ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून कार्यालयातून 09.10 वाजता रवाना होवून स्टेशन चौक, आष्टा, इस्लामपूर मार्गे, शिराळा बायपास रोडवरील गोरक्षनाथ मंदीर येथे सुरक्षित ठिकाणी 10.30 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर इनामदार मॅडम यांनी तक्रारदार शैलेश पाटील यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील हे त्यांचेकडील स्कोडा कार क्र.एमएच-03-बीएच-0206 मधून आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. अजय मरगु सावंत यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. प्रशांत सुदाम आमते यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचासमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांनी नवबौध्द घटक वस्ती वाकुर्डे खुर्द येथील विकास योजने अंतर्गत पेव्हींग ब्लॉकचे केले कामाचे ताबा पावती देणेसाठी व मंजुर बिलातील कपाती शासन जमा करणेकरीता ग्रामपंचायत वाकुर्डे येथील सरपंच सौ.शितल बाळासाहेब पाटील यांनी मंजूर बिल रक्कमेच्या 7 टक्के प्रमाणे लाचेची मागणी केली आहे अशा आशयाची हकीकत सांगीतले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे मध्ये "मी पाटील गल्ली वाकुर्डे खुर्द शिराळा येथे माझे कुटुंबासह राहण्यास आहे. आमचे तालुक्यातील श्री श्रीनिवास सदाशिव पाटील रा. तडवळे, ता. शिराळा, जि. सांगली यांना वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे े या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती पेंव्हग ब्लॉक बसविणेचे रक्कम 10,00,000/- रुपयेचे टेंडर मिळाले होते.

ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द, ता. शिराळा यांचेकडील क्र.ग्राप/ वर्कऑर्डर/2024/2025 दि.19.05.2025 टेंडर नं. ब-1/01/25-26 अन्वये काम सुरु करणे बाबत वर्क ऑर्डर दिली होती. त्याप्रमाणे वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे े या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती पेंव्हग ब्लॉक बसविणेचे काम सुरु केले होते. श्री श्रीनिवास सदाशिव पाटील रा. तडवळे, ता. शिराळा, जि. सांगली यांनी सदर कामावर देखरेख करणे बाबत सांगीतले होते. त्याप्रमाणे मी सदर काम पाहत होतो. श्री श्रीनिवास पाटील यांनी मला सदर कामाची देखरेख व प्रशासकीय कामकाजासाठी दि.12.03.2026 रोजी 500/- रुपयेच्या स्टॅम्पवर अधिकार पत्र दिले आहे.

दि.18.12.2025 रोजी सदर काम पुर्ण झाले होते. श्री रविंद्र मठकरी विस्तार अधिकारी, पंचायत समिती शिराळा यांनी दि.22.12.2025 रोजी वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे े या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती येथे पेंव्हग ब्लॉक बसवलेल्या ठिकाणी भेट देवुन पुर्ण झालेल्या कामाचा तपासणी अहवाल दिला होता.

श्री जाधव, डेप्युटी इंजिनियर, पंचायत समिती शिराळा यांनी कामाचे मोजमाप घेवुन नमुना 58 - सी प्रमाणे 9,90,776/- रुपयांचे बिल तयार करुन मंजुरी करीता जिल्हा परिषद सांगली येथे पाठवले होते. त्याप्रमाणे सदर बिलाचा पहिला हप्ता मंजुर करण्यात आला होता. गट विकास अधिकारी, पंचायत समिती शिराळा यांनी दि. 29.12.2025 रोजी ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द ता. शिराळा, जि. सांगली यांना वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे े या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर



Scanned with OKEN Scanner

चर्मकार वस्ती येथे पेॅव्हग ब्लॉक बसवले कामाचा पहिला व दुसरा हप्ता अदाई बाबत पत्र काढले होते. त्यानुसार अंतिम बिल अनुज्ञेय रक्कम 9,90,776/- रक्कमेच्या 60 टक्के पहिला हप्ता रक्कम 6,00,000/- रुपये मंजुर करण्यात आला होता. सदर कामाचे संदर्भातील विमा, उपकर, आयकर, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती मंजुर रक्कमेतुन शासनास जमा होणेसाठी 71435/- रुपये ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी खात्यावर जमा होवुन उर्वरीत रक्कम 528565/- रुपये श्रीनिवास पाटील यांच्या खात्यावर जमा झाले आहेत. परंतु ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांचे ग्रामनिधी खात्यावर जमा झालेले 71435/- रुपये शासन लेखाशिर्षकी खाते जमा केले नसल्यामुळे तसेच सदर पुर्ण झाले कामाची श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द व ग्रामसेवक यांची सही असलेली ताबा पावती दिली नसल्याने मंजुर बिलाचा दुसरा हप्ता मिळण्यास विलंब होत होता.

ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी खात्यावर विमा, उपकर, आयकर, टेंडर प्रमाणे, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती करीता जमा झालेले 71435/- रुपये शासन लेखाशिर्षकी खाते जमा करण्यासाठी व वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ं या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती येथे पेॅव्हग ब्लॉक बसवले काम ग्रामपंचायतीकडे वर्ग करुन त्याची ताबा पावती देण्यासाठी श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांची भेट घेतली असता सरपंच श्रीमती शितल पाटील सदर कामाचे एकूण मंजुर अनुदान रकमेच्या 7 टक्के रक्कम दिल्यानतरच कपाती शासन जमा करु व ताबा पावती सही करून देवु असे म्हणुन लाच मागत आहेत.

आज रोजी मी श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांची भेट घेवून ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधी खात्यावर विमा, उपकर, आयकर, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती करीता जमा झालेले 71435/- रुपये शासन लेखाशिर्षकी खाते जमा करणे व वाकुर्डे खुर्द, तालुका शिराळा येथील अनुसुचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे◌ं या योजनेअंतर्गत संत रोहीदास नगर चर्मकार वस्ती येथे पेॅव्हग ब्लॉक बसवले काम ग्रामपंचायतीकडे वर्ग करुन त्याची ताबा पावती देण्याचे कामा संदर्भात चर्चा करणार आहे. त्यावेळी श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द माझ्याकडे मंजुर अनुदार रक्कमेच्या 7 टक्के रक्कमेची लाच मागणी करतील याची मला खात्री आहे. मला श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांना लाच देण्याची इच्छा नाही. माझेत व श्रीमती शितल पाटील सरपंच ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विंनती." अशी हकीकत तक्रारी अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेविका शितल पाटील यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही 11.40 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये निवेदनाची फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याची खात्री करून दिली.

त्यानंतर लोकसेविका शितल पाटील यांचा ठावठिकाणा निश्चित करणेसाठी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांचे मोबाईलवरून त्यांना कॉल करून पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर आम्ही दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी त्यांचे मो.क्र. 9561532514 वरून लोकसेविका शितल पाटील यांचे मो.क्र. 9021082319 वर कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला.
लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारलेनंतर लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.52 वाजता सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांना त्या एक तासाने शिराळा येथे येत असलेचे सांगून आलेनंतर फोन करीत असल्याचे सांगून फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 002 ही सेव्ह असल्याची खात्री करून दिली.
त्यानंतर आम्ही सर्वानमुते लोकसेविका शितल पाटील यांचा तक्रारदार शैलेश पाटील यांना कॉल आलेनंतर पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे शिराळा गावामध्ये महत्वाचे काम असल्याचे सांगून सदरचे काम करून तात्काळ



Scanned with OKEN Scanner

येतो असे म्हणून ते 12.20 वा चे सुमारास निघून गेले. आम्ही व सापळा पथक असे गोरक्षनाथ मंदीर शिराळा येथे थांबून राहिलो. त्यानंतर 13.10 वा चे सुमारास तक्रारदार हे आमचे समक्ष हजर झालेत. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर लोकसेविका शितल पाटील 12.56 वाजता व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांचा 01.01 वाजता मिस कॉल येवून गेला असल्याची हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते तक्रारदार यांचे मोबाईलवरुन लोकसेविका यांचे मोबईलवर कॉल करून पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर आम्ही दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी त्यांचे मो.क्र. 9561532514 वरून लोकसेविका शितल पाटील यांचे मो.क्र. 9021082319 वर 13.19 वाजता कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर लोकसेविका शितल पाटील यांचा 13.19 वाजता कॉल येत असलेचे आम्हास पंचांसमक्ष सांगितले. लागलीच आम्ही दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार शैलेश पाटील यांनी लोकसेवकिा शितल पाटील यांचा कॉल स्विकारून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.19 वाजता सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांना त्या पंचायत समिती शिराळा येथे आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना 10 मिनीटामध्ये तेथे येत असलेचे सांगून फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 003 ही सेव्ह असल्याची खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार शैलेश पाटील व पंच नं.1 अजय सावंत यांना लोकसेविका शितल पाटील, सरपंच यांचेकडे पंचायत समिती शिराळा येथे पाठवून त्यांचेकडे पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील व पंच क्र.1 अजय सावंत यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.28 वाजता सुरु करून तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार श्री. शैलेश पाटील व पंच नं.1 श्री. अजय सावंत यांना पंचायत समिती शिराळा येथे लोकसेविका शितल पाटील, सरपंच यांची भेट घेणेकरीता रवाना होणे बाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार व पंच नं.1 सावंत असे तक्रारदार यांचेकडील स्कोडा कार क्र.एमएच-03-बीएच-0206 मधून रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. शैलेश पाटील व पंच नं.1 अजय सावंत असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 15.40 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. अजय सावंत यांना, लोकसेविका शितल पाटील, सरपंच यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारला, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील कार मधून रवाना होवून शिराळा पंचायत समिती येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी बाळासाहेब पाटील यांना फोन केला असता त्यांनी ते पाटील मळा येथे शाळेमध्ये गेले असलेचे सांगून एक अर्धा तासाने येत असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी असे पंचायत समिती शिराळा चे बाहेर कारमध्ये बसून त्यांचे येण्याची वाट बघत बसलो.

त्यानंतर तक्रारदार यांनी दोन-तिन वेळा लोकसेविका शितल पाटील यांना कॉल करून विचारणा केली असता त्यांनी शिराळा येथे येत असलेचे सांगितल्याने आम्ही त्यांची येण्याची वाट पाहिली.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांना शितल पाटील यांचा कॉल आला त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना दौलत हॉटेल येथे येण्यास सांगितले.

त्यानंतर तक्रारदार व मी असे तहसिल कार्यालय शिराळा समोरील दौलत हॉटेल येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी हॉटेलमधील एका अनोळखी महिला व एक अनोळखी पुरुष यांची हॉटेलमध्ये भेट घेवून त्यांचे कामा संदर्भात चर्चा करू लागले. मी देखील त्यांचे सोबत बसून राहिलो. त्यावेळी त्यांचेतील चर्चेवरून अनोळखी महिला ही लोकसेविका शितल पाटील, सरपंच, वाकुर्डे खुर्द व अनोळखी पुरुष हे सदर सरपंच महिलेचे पती बाळासाहेब पाटील असल्याची माझी खात्री झाली.

त्यानंतर तक्रारदार शैलेश पाटील यांनी त्यांचे कामा संदर्भात लोकसेविका शितल पाटील, सरपंच व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांचेशी चर्चा करु लागले. त्यावेळी लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांना "सात टक्यान कर" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "सात टक्केन पैसे किती होत्यात बघा" असे विचारले.



Scanned with OKEN Scanner

त्यावेळी बाळासाहेब पाटील यांनी "मी काय बोलणार न्हाय तुच सांग" असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेमध्ये दुस-या बिला संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांना "दोन्ही पण विषय कर म्हणजे डोक्याला ताप न्हाय" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना हया एकाच बिलाची विषय क्लिअर करणेचे सांगितले. त्यानंतर बाळासाहेब पाटील यांनी तक्रारदार यांना "सात न्हाय ...पाच टक्के" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "पाच टक्केन सांगा कि रक्कम तर किती होत्या करा कि कॅल्कयुलेशन..... दहा लाख रूपयाच हाय काम" असे म्हणाले. त्यावर बाळासाहेब पाटील यांनी त्यांचेकडील मोबाईलवर 50,000 असा आकडा टाईप करून दाखविला. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "पन्नास हजार.....पण तस लई होत्यात गुरूजी" असे म्हणाले. त्यावर लोकसेविका शितल पाटील यांनी "न्हाय तर लई होत...दे" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना रक्कम कमी करणेची विंनती केली. त्यावर शितल पाटील यांनी "पाच टक्यान दयाकी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "आओ पाच टक्यान पन्नास हजार होत्यात मॅडम" असे म्हणून "तिस हजार रुपये मी देतो" असे म्हणाले. त्यावर बाळासाहेब पाटील यांनी तक्रारदार यांना "एक काम कर पस्तीस दे" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 35,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना अर्धा-पाऊन तासाने पैशाची जुळणी करून पैसे घेवून येथेच हॉटेल दौलत येत असलेचे सांगून तक्रारदार व मी तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" अशी हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांना पडताळणी कारवाईची हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं. 1 यांचे हकिकत प्रमाणे हकिकत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरून लोकसेविका शितल पाटील यांचे मो.क्र. 9021082319 व बाळासाहेब पाटील यांचे मो.क्र.7020140934 यावर कॉल केला असलेची हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. शैलेश पाटील व लोकसेविका शितल पाटील, सरपंच व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 004 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाई मध्ये, लोकसेविका शितल पाटील, सरपंच ग्रामपचंायत वाकुर्डे खुर्द व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांनी तक्रारदार यांचे कामाचे ताबा पावती देणेकरीता तसेच सदर कामाच्या कपाती शासन जमा करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे एकुण मंजूर अनुदान रक्कमेच्या म्हणजे 10 लाख रुपये रक्कमेच्या प्रथमत: 7 टक्के, त्यानंतर 5 टक्के प्रमाणे 50,000/- रूपये व तडजोडीअंती 35,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदरची लाच रक्कम हॉटेल दौलत येथे स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेविका शितल पाटील, सरपंच व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांचेविरूध्द हॉटेल दौलत येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांना लोकसेविका शितल पाटील, सरपंच व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांनी मागणी केलेली 35,000/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार श्री.शैलेश पाटील यांनी त्यांचेकडील 500/- रूपये दराचे 70 नोटा असे एकुण 35,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले.

त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 35,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी सांगितलेप्रमाणे तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोकॉ/चंद्रकांत जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटांचा बंडल तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यामध्ये ठेवला व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. रेकॉर्डरमध्ये पडताळणीवेळची मेमरीकार्ड बाहेर काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर आम्ही 16.19 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये फाईल क्रमांक आरईसी 001 ही सेव्ह असल्याच्या खात्री करून दिल्या.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. शैलेश पाटील, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार पोकॉ/जाधव यांना गोरक्षनाथ मंदीर शिराळा येथे



Scanned with OKEN Scanner

थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेविका यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेविका शितल पाटील यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.32 वाजता सुरू करून लेसव्दारे तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकवून लोकसेविका शितल पाटील यांची तहसिल कार्यालय शिराळा समोरील हॉटेल दौलत येथे भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. शैलेश पाटील व पंच नं. 1 श्री. अजय सावंत असे तक्रारदार यांचेकडील स्कोडा कार क्र. एमएच-03-बीएच-0206 मधून रवाना झाले.

त्यांचे पाठोपाठ मी, इनामदार मॅडम, पंच नं. 2 श्री. प्रशांत आमते, पोना/प्रितम चौगुले, पोशि/अजित पाटील व चालक रजपूत असे लॅपटॉप, पिं्रटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन शासकीय वाहन महिंद्रा बोलेरो नं. एमएच-10-डीक्यु-9530 मधून रवाना झालो. पोकॉ/जाधव हे गोरक्षनाथ मंदीर शिराळा येथे सुटकेससह थांबून राहिले.

तक्रारदार व पंच नं.1 असे शिराळा बायपास रोडने शिराळा गावातून तहसिल कार्यालय शिराळा समोरील हॉटेल दौलत येथे दाखल होवून त्यांनी कार रोडकडेला पार्क केली. लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे चालक रजपूत यांनी आमचेकडील वाहन तक्रारदार यांचेकडील वाहनापासून काही अंतरावर थांबवली. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 सावंत असे कारमधून खाली उतरून हॉटेल दौलतचे पोर्चमध्ये गेलेचे दिसले.

लागलीच मी, पंच नं.2, इनामदार मॅडम व अंमलदार चौगुले व पाटील असे आमचेकडील वाहनामधून खाली उतरून दौलत हॉटेलचे आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो. त्यावेळी तक्रारदार शैलेश पाटील यांनी कोणाला तरी फोन केलेचा दिसला. त्यानंतर काही वेळाने एक अनोळखी महिला व एक अनोळखी पुरूष असे हॉटेल दौलत येथे येवून तक्रारदार यांचेशी चर्चा करीत असलेचे दिसले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. शैलेश पाटील यांनी बाजुस येवून त्यांचे खिश्यातील हातरुमाल बाहेर काढून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच मी व सापळा पथक असे तक्रारदार, व पंच नं.1 सावंत हे थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.47 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या.

त्यानतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यावेळी पंच नं.1 सावंत यांनी लोकसेविका शितल पाटील यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारून त्यांचे पर्समध्ये ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर मी लोकसेविका शितल पाटील व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांना आमची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर इनामदार मॅडम यांनी लोकसेविका शितल पाटील यांचे ताबेतील पर्सची तपासणी केली असता पर्समध्ये 500/- रूपये दराच्या 70 नोटा मिळून आल्या.

त्यानंतर पंच नं.2 प्रशांत आमते यांनी सदर 500/- रूपये दराच्या नोटांचे नंबरची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळापुर्व कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. प्रशांत आमते यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली.

त्यानंतर इनामदार मॅडम यांनी लोकसेविका शितल पाटील यांना ताबेत घेवून आमचेकडील शासकीय वाहनामध्ये जरूर तो अंधार करून अ ॅल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात त्यांचे हातांची व पर्सची तपासणी केली असता शितल पाटील यांचे उजवे हातांचे बोटास व पर्समध्ये पैसे ठेवलेल्या कप्प्यात अ ॅथ्रॉसिन पावडर लागलेची निळसर चकाकी दिसून आली. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर मी तक्रारदार व सापळा पथकातील अंमलदार व पंच यांच्या अ ॅथ्रॉसिन पावडर लागलेबाबतच्या तपासण्या हया शासकीय वाहनामध्ये पुर्ण केल्या.

त्यानंतर मी लोकसेविका शितल पाटील यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव सौ. शितल बाळासाहेब पाटील, वय-43 वर्षे, पद - सरपंच, ग्रामपंचायत, वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली असे असलेचे सांगितले. व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. बाळासाहेब आकाराम पाटील, वय-53 वर्षे, पद - प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शाळा जाधववाडी,



Scanned with OKEN Scanner

माधळगाव, केंद्र वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली, रा. पाटील गल्ली, वाकुर्डे खुर्द, ता.शिराळा जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेविका शितल पाटील यांना तक्रारदार यांचे प्रलंबित कामाचे फाईलची विचारणा केली असता त्यांनी सदरची फाईल ग्रामपंचायत वाकुर्डे खुर्द येथे असलेचे सांगितले. तक्रारदार यांचे प्रलंबित कामाची फाईल ताबेत घेणेचे तजवीज ठेवली.

त्यानंतर आम्ही गोपनीयतेच्या दृष्टीने व कारवाईच्या सोईकरीता शासकीय विश्रामगृह शिराळा येथे जाणेचे निश्चित केले. मी तक्रारदार यांना शासकीय विश्रामगृह शिराळा येथे जाणेस सांगितले. त्यानंतर आम्ही लोकसेविका शितल पाटील व त्यांचे पती बाळासाहेब पाटील यांना ताबेत घेवून 17.20 वा चे सुमारास हॉटेल दौलत येथून रवाना होवून 17.25 वा शासकीय विश्रामगृह शिराळा येथे दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं.1 श्री. अजय सावंत यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील कार मधून रवाना झालो. त्यावेळी गाडीमध्ये असताना तक्रारदार यांना शितल पाटील यांचा कॉल आला त्यावेळी शितल पाटील यांनी तक्रारदार यांना कुठे आहे अशी विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी "याय लागलोय आता एक पाच मिनीटात पोहोचतोय तुम्ही कुठाय" असे विचारले असता शितल पाटील यांनी "आम्ही इथय पंचायत समितीजवळ" असलेचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "पाच मिनीटात आलो दौलत हॉटेलजवळ आलो या" असे म्हणाले.

त्यानंतर तक्रारदार व मी असे तहसिल कार्यालया समोरील हॉटेल दौलत येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी शितल पाटील यांना कॉल केला असता त्यांनी तक्रारदार यांचा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर लागलीच लोकसेविका शितल पाटील व त्यांचे पती बाळासाहेब पाटील हे चालत हॉटेल दौलत येथे तक्रारदार व मी थांबले ठिकाणी येवून तक्रारदार यांचेशी चर्चा करू लागले. त्यावेळी शितल पाटील यांनी तक्रारदार यांना त्यांचे डोंगारई गावातील कामाचे बिल सोडले असलेचे सांगितले. त्यावेळी बाळासाहेब पाटील यांनी तक्रारदार यांना "आणलाय काय?" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांना त्यांचे पॅन्टचे उजवे बाजूस ठेवली लाच रक्कम बाहेर काढुन लोकसेविका शितल पाटील व बाळासाहेब पाटील यांचेसमोर धरून "घ्या की आता" असे म्हणाले. त्यावर बाळासाहेब पाटील यांनी त्यांना "किती हायत?" असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी "मोजुन घ्या... पस्तीस हजार रुपये हायत" असे म्हणाले. त्यावर बाळासाहेब पाटील यांनी "ह" असे म्हणून त्यांची पत्नी शितल पाटील यांना हाताने इशारा करून रक्कम घेण्यास सांगितली. त्यावेळी शितल पाटील यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचेकडील पर्समध्ये ठेवली. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेविका यांना " ते ताबा पावती आणी कपाती तेवढ एक उदयाच्या दिवसात करून दिलसा म्हणजे तेवढ माझ विषय सगळा क्लीअर होतय " असे म्हणून बाजूस येवून त्यांचेकडील हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच आपण व सापळा पथक असे आमचेजवळ आलात" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.शैलेश पाटील यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 सावंत यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही शासकीय विश्रामगृह, शिराळा येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 06/04/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान, लोकसेविका सौ. शितल बाळासाहेब पाटील, वय-43 वर्षे, पद - सरपंच, ग्रामपंचायत, वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली यांनी आपले स्वत:चे पदाचा गैरवापर करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडे वाकुर्डे खुर्द येथील नवबौध्द घटकांचा विकास करणे या योजनेअंतर्गत पेव्हींग ब्लॉक बसविले कामाचे बिलाचा दुसरा हप्ता मिळणेकरीता आवश्यक असलेली सदर कामाची ताबा पावती देणेकरीता व सदर कामाचे ग्रामपंचायतीचे ग्रामनिधी खातेवर जमा झालेली विमा, उपकर, आयकर, सीजीएसटी व एसजीएसटी अशा शासन कपाती शासनास जमा करणेकरीता सदर बिलाचे एकुण अनुदान रक्कम 10 लाख रूपये च्या प्रथमत: 7 टक्के, त्यानंतर 5 टक्के प्रमाणे 50,000/- रूपये व तडजोडीअंती 35,000 /- रूपये लाचेची मागणी केली. व सापळा कारवाईवेळी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम 35,000/- रूपये स्विकारली आहे.

तसेच लोकसेवक श्री.बाळासाहेब आकाराम पाटील यांनी पडताळणी कारवाईवेळी तक्रारदार व लोकसेविका शितल पाटील सरपंच यांचे चर्चेमध्ये सहभाग घेवून तक्रारदार यांचेवर स्वत:चा प्रभाव पाडून भ्रष्ट व गैरमार्गाने त्यांची पत्नी लोकसेविका शितल पाटील यांचेकरीता 35,000/- रूपये लाचेची मागणी केली व तक्रारदार यांना त्यांचे काम लोकसेविका शितल पाटील यांचेकडून करून देण्याची हमी दिली.

म्हणुन माझी लोकसेविका सौ. शितल बाळासाहेब पाटील, वय-43 वर्षे, पद - सरपंच, ग्रामपंचायत, वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 चे कलम 7 प्रमाणे व लोकसेवक श्री.



Scanned with OKEN Scanner

बाळासाहेब आकाराम पाटील, वय-53 वर्षे, पद - प्राथमिक शिक्षक, प्राथमिक शाळा जाधववाडी, माधळगाव, केंद्र वाकुर्डे खुर्द ता.शिराळा, जि.सांगली दोन्ही राहणार पाटील गल्ली, वाकुर्डे खुर्द ता.शिराळा जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 चे कलम 7 अ प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिंटरट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.
समक्ष

हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Uday vishnu patil
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DGPUVPM9301
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Bhade.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

HC1317
पोलीस ठाणे अंमलदार
शिराळा पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner

Name (नाव): Jambaji Ramchandr
Rank(पद): [illegible] (Inspector)
No.(नं.): DGPJRBM7003

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ चा जोडपत्र): Physical features, deformities and other details of the [illegible] ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with OKEN Scanner